I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 399-402 | e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal | OPEN ACCESS | Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोरोना महामारीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा. डॉ. निलकंठ ठावरी

अर्थशास्त्र विभागप्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी
Corresponding Author : vitthalthawari@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022

**संदर्भ :**
भारताने १९९१ मध्ये जागतिकीकरण स्विकारले. १९९० ला भरतावर मोठे संकट ओढवले. त्यावेळेस भारताजवळ विदेशी गंगाजळीचा साठा संपुष्टात आला होता. आंतराष्ट्रिय स्तरावर अमेरीका व इतर पाश्चात्य राष्ट्रांचे प्राबल्य होते. त्यामुळे भारताला अमेरीकेच्या दबावाखाली येवून नविन आर्थिक धोरण स्विकारावे लागले. भारतासाठी २०२०—२१ हे वर्ष कोरोनाच्या प्रादृभावामुळे अत्यंत त्रासाचे व कष्टाचे व आथिक विकासावर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारे ठरले. देशातील कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक, राजकिय, आर्थिक व आरोग्यविषक संकटाचे विकासावर प्रतिकूल परिणाम होतात. कोव्हिड—१९ चा प्रसार नियंत्रीत करण्यासाठी वेगवेगळया देशातील सरकारने स्विकारलेल्या टाळेबंदीचे अत्यंत प्रतिकूल परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाले.

कोरोना प्रतिबंधीत करण्यासाठी लोकांचा एकमेकांशी संपर्क होवू नये म्हणून लॉकडाउन, भौतिक दुरता व तोंडाला मास्क लावणे, वारंवार साबनाने हात धुने असे सोपे व सरळ उपाय योजण्यात आले. परंतू लॉकडाउ भारताने अतिशय कठोरपणे व प्रामाणिकपणे लागू केला. त्यामुळे संपूर्ण क्षेत्र, समाज जेथे होता तेथे बदिस्त झाला लॉकडाउनमध्ये सर्वच व्यवहार जैसे थे राहले त्यामुळे सहदारी बंद, कारखाने बंद, यातायात बंद, बाजारपेठ बंद, सर्वव्यवहार बंद, कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्र, शेती क्षेत्र आरोग्य क्षेत्र, उद्योग क्षेत्र, असंघटीत क्षेत्राला तडाखा, पर्यावरणपूरक टाळेबंदी अशाप्रकारचे परिणाम झाले.

सद्यस्थितीत भारतात कोरेनाचा प्रभाव थोडा फार कमीझाल्यामुळे सरकारने उद्योग, सेवा व दळणवळण हे क्षेत्र सुरू केले व त्यामुळे देशाचा आर्थिक विकास दर सुधारत आहे. कोवीड—१९ वर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरणाला सुरूवात झाली आहे. आरोग्य, शिक्षण पायाभूत सेवा आणि सुविधा मोठया प्रमाणावर वाढविण्याबरोबरच खाजगी क्षेत्राचे नियमन करणे आवश्यक आहे.

**बिजशब्द —** जागतिकीकरण, औद्योगीकरण, विदेशी गंगाजळी, बाजारपेठ.

**प्रस्तावना:**
भारताने १ जुलै १९९१ मध्ये जागतिकीकरण स्विकारले. या मागिल भूमिकेचा आढावा घेणे अगत्याचे आहे. १९९० ला भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे संकट आढळले. व त्या बरोबरच जागतिक विकशित राष्ट्राचे धोरण ही कारणीभूत ठरले वास्तविक पाहता १९८० पासूनच जगात जागतिकीकरणाच्या भूमिकेचा दृष्टीकोन वाढिस लागला अनेक विकसीत व अविकसीत राष्ट्रांनी सुध्दा जागतिकीकरणा शिवाय पर्याय नाही अशी भूमिका घेतली. या भूमिकेमागे दोन कारणे होती. एक तर पाश्यात्य विकसीत राष्ट्रांनी जागतिक विकसनशील व अंविकसीत राष्ट्रावर लादलेले धोरण म्हणून त्याचा विचार करता येईल, किवा जगातिल विकसनशील व अविकसीत राष्ट्रांवरील संकटांचे परिमार्जन करण्यासाठी जागतिकीकरण स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. या दोन्ही प्रश्नांचा विचार केल्यास जागतिकीकरणाची अगतिकता लक्षात येते. त्यातिल पहिले कारण म्हणजे अमेरीका, इंग्लड व विकसीत पाश्चिमात्य राष्ट्रांतील आर्थिक विकासाचा दर स्थिर झाला होता. इंग्लडमध्ये औद्योगीक क्रांतीपासून तर दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या कालखंडापर्यंत अमेरिका व युरोपीय विकसीत राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण झाले होते औद्योगीकरणामुळें त्याच्या उत्पादनात अनन्य साधारण वाढ घडून आली. वस्तु व सेवाच्या सर्व क्षेत्रात इतके उत्पादन झाले की कोणत्या नविन उत्पादनाच्या क्षेत्रांत गुंतवणूक करावी हि समस्या या राष्ट्रांमध्ये निर्माण झाली.'प्रत्येक पुरवठा स्वत:ची मागणी निर्माण करतो' त्यामुळे अतिउत्पादन व बेरोजगारीची समस्या निर्माण होत नाही हा परंपरागत अर्थशास्त्रज्ञ जे.बी.से याच्या रोजगारीचा सिध्दांत अनुपयुक्त ठरला व अतिउत्पादनामुळे गुंतवणुकीचा दर कमी झाला.

१९९० मध्ये भारतीय अर्थ व्यवस्थेवर मोठे संकट ओढवले. विदेशी गंगाजळीचा साठा संपुष्टात आला. केवळ दोन आठवडे पुरेल इतकीच गंगाजळी भारताकडे शिल्लक

राहीली. या परिस्थितीत जागतिक वित्तीय संस्थाकडून मदतीच्या रूपाने कर्जाची मागणी करणे व आर्थिक संकटावर मात करणे याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, जागतिक बॅक, जागतिक व्यापार संघटना इ. आंतराष्ट्रिय संस्थावर अमेरिका व इतर पाश्चात्य राष्ट्राचे पाबल्य होते, म्हणुन विशिष्ट अटी आणि शर्तीवरच संकटात सापडलेल्या देशांना आर्थिक मदत करावी असे धोरण त्यांनी आखले. यातुन मार्ग काढण्यासाठी निरूपायास्तव भारताला जागतिकीरणाचा अवलंब करावा लागला. भारताने जागतिकीकरण स्विकारण्यामागील हे वास्तव आहे. आज कितीही प्रयत्न केले तरी जागतिकीकरणापासुन कोणालाही अलिप्त राहता येणार नाही हे सत्य स्विकारूनच आपापल्या अर्थव्यवस्थांची वाटचाल निश्चित करावी लागणार आहे. या बडया महासत्तांना हे खरे वास्तव पुढे येऊ न देता जणुकाही जगाच्या कल्यानासाठी आपण एक फार मोठी चळवळ उभारित आहेत. आणि त्यामध्ये प्रत्येक देशाने सहभागी होणे काळाची गरज आहे असे भासविण्याचा प्रयत्न केला आणि आंतराष्ट्रिय मुद्रानिधी व जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून जगभर ते नियंत्रीत करण्याचे धोरण आखले. भारताने स्वातंत्र प्राप्त झाल्यानंतर देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप स्विकारले. परंतू १९९१ नंतर स्विकारलेले नविन आर्थिक सुधारांचे धोरण हे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रारूप भांडवलशाहीला चालना देणारे व मुक्त व्यापाराचे समर्थन करणारे ठरले. परिणाम: भांडवलशाहीचे दोष भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण होवून आर्थिक विषमता, दारीद्रय व बेकारीसारख्या समस्यांनी आज उग्र रूप धारण केले आहे. उदारीकरण व खाजगीकरण या धोरणामुळे खाजगी भांडवलदाराचे जास्त हित साधले गेले. भारतीय समाजव्यवस्थेत पुर्वीच असलेल्या वर्ण जाती व्यवस्थेला आनखी खतपाणी मिळाले. श्रीमंत व गरीब यातील दरी वाढत गेली. व सोबतच सामाजिक, आर्थिक विषमताही वाढत गेली.

भारतासाठी आर्थिक वर्ष २०२०–२१ हे अत्यंत त्रासाचे, कष्टाचे आणि विशेष म्हणजे विकासावर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारे होते. वर्ष २०१७ नंतर आर्थिक घसरणीसझालेली सुरूवात वाढत जाऊन तिची तिव्रता आणि व्याप्ती सातत्याने वाढतच गेली. तिचे वाईट सामाजिक आणि आर्थिक परिणाम देशाला आणि समाजाला भोगावे लागत आहेत. तिच्या नियंत्रणाचे धोरण आणि उपाय राबविणे सुरू असतांनाच अतिवृष्टी आणि महापूराचा झटका महाराष्ट्र आणि इतरही काही राज्यांना सहन करावा लागला की, ज्यामुळे देशाचा आणि राज्याचा विकास घसरत जाण्यास मदतच झाली. या नैसर्गिक संकटकालीन परिस्थितीतुन बाहेर पडण्यापूर्वीच कोरोना महामारीचेसंकट येऊन धडकले. देशातील कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक, राजकीय, आर्थिक आणि आरोग्य विषयक संकटाचे विकासावर परिणाम प्रतिकूल आणि घातकच होतात असे दिसून येते. कोविड–१९ ची लागण नियंत्रित करण्यासाठी आपण स्विकारलेल्या टाळेबंदीचे अत्यंत प्रतिकूल परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहेत. या पार्श्वभूमीवर कोरोना महामारिचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे बहुआयामी विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोरोना विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी संपूर्ण जग मागे लागले व काही उपाय त्यांनी हा कोरोना प्रतिबंधीत करण्यासाठी केलेत. लोकांचा एकमेकांशी संपर्क होऊ नये म्हणून लॉकडाऊन,व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी भौतिक दुरता व तोंडाला मास्क लावणे, वारंवार हात साबणाने धुणे असे ते सोपे–सरळ उपाय होते. परंतु लॅकडाऊन जो भारताने अतिशय कठोरपणे व प्रामाणिकपणे लागू केला, त्याचा परिणाम असा झाला की संपूर्ण क्षेत्र, समाज हा जिथे होता तिथे बंदिस्तझाला. लॉकडाऊनमध्ये सर्वाचे व्यवहार 'जैसे थे' राहिले. त्यामुळे रहदारी बंद, कारखाने बंद, यातायात बंद, बाजारपेठ बंद सर्व व्यवहार बंद.

परिणामी कोरोनाचा विस्तार रोखण्यास बऱ्यापैकी मदत झाली हे नाकारून चालणार नाही पण त्याच बरोबर देशाची आर्थिक परिस्थिती दिवसे–दिवस खालावत आहे वसंपूर्ण समाज एका विवक्षित व भयप्रद वातावरणात दिवस घालवत आहे. उद्योग बंद असल्यामुळे कामगार बेरोजगार झाले आहेत. एकुण काय की, सर्व स्थिती अतिशय बिकट झाली आहे.''कोरोना महामारी से हमे लढना है और उसे जितना है !'' '' कोरोना हारेगा,भारत जितेगा'' हे नारे सतत सुरू आहेत. कारण कुठलीही लढाई जिकांयची असेल तर या गोष्टी सतत मनात बिंबवायच्याच असतात. त्यामुळे किलींग इंस्टिंक्ट' येते व माणूस यशस्वी होतो.

**कोरोना महामारी व भारतीय अर्थव्यवस्था :**

चीनच्या वुहान शहरातून निर्माण झालेल्या कोरोना वायरसने संपूर्ण जगाला वेढून टाकले आहे. भूतलावावर असा कोणताही देश उरला नाही, ज्या देशामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव झाला नाही. ३० जानेवारी २०२० मध्ये कोरोना भारतामध्ये धडकला. या वायरसच्या दहशतीमुळे शेअर मार्केट मिडीयाच्या अहवालानुसार जगभरातील एअर लाईन्सचे चीनसह अनेक शहरामध्ये आपल्या सेवा बंद

केल्या. याचा परिणाम चीन, दक्षिण कोरीया, ऑस्टेलिया या भागातील शेअर बाजारावर दिसून आला. जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा नकारात्मक परिणाम झाला. सुरूवातीच्या काळात इटली, ब्राझील, अमेरीका, दक्षिण कोरीया इ. देशांच्या तुलनेत भारतामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव संथगतीने राहीला परंतू हळूहळू या संकटाने आपले पाउल घट्ट करण्यास सुरूवात केली. २०२० च्या पहिल्या सहामाहीत म्हणजे जानेवारी ते जुन या कालावधीत आथिक विकास दरात वाढ होण्याचा अंदाज मुडीज इन्व्हेस्टर सर्व्हिस ने व्यक्त केला होता. तो आज मात्र ऋनात्मक झाला आहे. कोरोना व्हायरसच्या प्रसारामुळे जगभर लॉकडावूनचा अवलंब केल्यामुळे जानेवारी २०२० मध्ये भारताचा आर्थिक विकास दर ३ टक्क्यापर्यंत खाली आला होता. वेळोवेळी लॉकडाउचा अवलंब केल्यामुळे तो सद्य स्थितीत उणे २३.९ टक्के इतका ऋणात्मक झाला होता. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ही गंभिर समस्या आहे. आर्थिक विकास दरातील हे गार्भिय लक्षात घेता पुढच्या एक दशलक्षापर्यंत आर्थिक मंदी व अर्थव्यवस्थेचे उत्थान होणार नाही असे खेदाने म्हणावे लागेल.

कोरोना महामारीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर कमी—अधिक परिणाम झाल्याचे दिसून येते. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने केलेल्या लॉकडाउनमुळे उद्योग, सेवा, आरोग्य, शिक्षण, रोजगार, दळणवळण यासारख्या क्षेत्रावर फारच विपरीत परिणाम झाले. आरोग्याच्या दृष्टीने कोरोनाकडे पाहणे महत्वाचे आहेच पण या व्हायरसचे अर्थकारणावर होणारे परिणामही अतिशय तिव्र आहेत. या आजारामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परीणाम आता स्थानिक पातळीवर ठळकपणे दिसू लागला. जागतिक व्यापाराची पुरवठा साखळीच विस्कळीत करून या विषानुने जागतिक अर्थव्यवस्थेला जेरीस आणले असेच म्हणावे लागले. सुमारे १५ अब्ज डॉलरचा फटका केवळ कोरोनामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला बसला आणि तो यापुढेही वाढतच जाणार आहे.

देशातील वाहन उद्योगही अडचणीत आहे. चीनमधून भारतात येणाऱ्या गाडयांचे सुटे भाग व औषधांनाही लागणारा कच्चा माल उपलब्ध होत नसल्याने त्यांचा औषध व वाहन उद्योगावर विपरीत परिणाम झालेला आहे. आपल्याकडील पर्यटन व वाहतूक क्षेत्र मंदीच्या सावटाखाली आहे. तिर्थक्षेत्र, हॉटेल, शॉपींग मॉल तसेच गर्दीच्या जागा ओस पडतांना दिसतात. कृषी क्षेत्रालाही मोठा फटका या कोरोनामुळे बसला आहे. कांदयाला मिळणारा भाव कमी होत असतांना पालेभाज्या आणि फळांची मागणीही घटली. देशातून मासे आणि कोळंबीचीही मोठया प्रमाणात निर्माण होते. कोरोनासंदर्भात परसलेल्या अफवांचा सर्वात मोठा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसलाय, तसेच पोल्ट्रीशी संबंधित इतर पुरक उद्योगावरही याचा विपरीत परिणाम झाला आहे. खाद्य निर्माती करणाऱ्या कंपण्यांनी खरेदी थांबविल्यामुळे मका व सोयाबिन सारखी पिके घेणारे शेतकरी अडचणीत आले आहे.

**१) सेवा क्षेत्र** :— कोरोना विषाणूचा प्रसार होत असल्याने राज्य सरकारांनी मुक्त संचारावर लावलेल्या निर्बंधामुळे सर्वात मोठा परिणाम सेवा क्षेत्रावर झाला. लोकांना कामाच्या ठिकाणी सार्वजनिक वाहनाने जाता येत नसल्याने बेरोजगारीत वृध्दी झाली. यातच भारतातील बहुसंख्य रोजगार असंघटीत क्षेत्रातील असल्याने, कामाच्या अभावाने लाखो स्थालांतरीत मजुरांना त्यांच्या मुळे गावी परतावे लागले.सी.एम.आयच्या मते मार्च २०२० च्या शेवटच्या आठवडयात शहरी भागातील बेकारी चा दर ३० टक्कयापर्यंत वाढला. तो ग्रामीण भागासाठी २१ टक्क्यांपर्यत वाढला, तर एकूण देशासाठी २० टक्क्यापर्यंत वाढला होता.पर्यटन रिटेल आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रावरही नकारात्मक परिणाम झाला. चांगली बाब म्हणजे तद्नंतर आलेल्या अनलॉकमध्ये ही स्थिती बदलली असून या क्षेत्रात पून्हा एकदा मागणीत वाढ होत आहेत

**२) शेती क्षेत्र** :— कोरोनाचा शेती क्षेत्रावरही प्रतिकूल परिणाम झाला. या वर्षी अतिरिक्त पाऊस, महापूरामुळे खरिपाचा हंगाम नुकसानीचा गेला. मात्र रब्बी पिकांचे उत्पादन चांगले झाले. टाळेबंदीमुळे सर्व कामे बंद राहिले. यामुळे पिकांची कापणी व काढणी करता आली नाही. तसेच प्रक्रिया उद्योगांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली. टाळेबंदिचा शेती आणि पुरक व्यवसायावरील परिणाम राज्य आणि क्षेत्रनिहाय वेगळा झाल्याचे दिसून आले. धान्य साठा पुरेसा असला तरी भविष्यात टंचाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मत अखिल भारतीय शेती संघर्ष समितीचे समन्वयक शहा यांनी व्यक्त केले होते. मात्र अनलॉकमध्ये ही स्थिती बदललेली दिसून येते. शेतमालाला चांगली मागणी असल्याचे दिसून येते.

**३) आरोग्य क्षेत्र** :— कोरोना विषाणू आजारामुळे आरोग्य क्षेत्रातील कंपण्याची विक्री मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. आरोग्य व फार्मा क्षेत्रातील शेअर्सच्या किमतीत मोठी वाढ दिसून आली. मोबाईल ॲपच्या माध्यमातून ग्राहक डॉक्टरांचा सल्ला घेत असल्याचे फार्मा हेल्थ टेक कंपण्यांनाही डिजीटल क्षेत्रात संधी उपलब्ध झाली आहे. या

घटनांचा परिणाम म्हणून हेल्थ क्षेत्रावर जास्त लक्ष केन्द्रित झाल्याचे दिसून येते. लोक आरोग्याची काळजी घेतांना दिसून येत आहेत.

**४) उद्योग क्षेत्र :—** सद्या देशात आर्थिक मंदी आहे. कोळसा, नैसर्गिक वायु., खनिज तेल, पोलाद निर्मिती, सिमेन्ट, खते, तेल शुद्धीकरण प्रकल्प इत्यादी क्षेत्रामध्ये मंदी असल्याचे दिसून येते. वाहन विक्री घटली आहे. मागणी कमी असल्याने सर्वच कंपण्याचे उत्पादन अंदाजे १५ ते २० टक्के घटल्याचे दिसून येते. त्यामुळे उद्योग क्षेत्रात बेकारीमध्ये मोठया प्रमाणात वाढझालेली आहे. अर्थव्यवस्थेत मंदी सदृष्य परिस्थिती असल्याचे दिसून येते.

**५) असंघटीत क्षेत्राला तडाखा :—** भारतात ९० टक्के नोकऱ्या या असंघटीत क्षेत्रात आहेत. अगदी रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रत्यावरचे खेळणी विक्रेते, चहावाले यापासून तर वेटर, गॅरेजवाले, मॉलमधील तरूण—तरूणी, भंगार जमा करणारे, बांधकाम क्षेत्रात काम करणारे क्षेत्रात काम करणारे मंजुर, अर्धकुशाल, अकुशल कामगार अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरानामुळे संक्रात आली आहे. अनेकांनी बॅंकाकडून कर्ज घेवून वाहने खरेदी केलेली आहेत. पण कोरोनाचा वाहतुक क्षेत्रावरही परिणाम झाल्यामुळे भविष्यात वाहन कर्जाचा हप्ता थकल्यास बॅंकाचाही एनपीए वाढणार आहे मल्टीप्लेक्स बंद असल्यामुळे व तसेच नाटकांनाही परवानगी नसल्यामुळे नाटयक्षेत्रातील कलाकार आणि पडदयामागे काम करणारे कामगार यांच्या उत्पनावरही कोरोनाचा परिणाम झालेला आहे.

**६) पर्यावरणपूरक टाळेबंदी :—** कोवीड —१९ टाळेबंदीचा प्रतिकुल आणि दूरगामी आर्थिक परिणाम झाला असला तरी पर्यावरण गुणवंता आणि दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे मुदमद आणि इतर अभ्यासाप्रमाणे नासा आणि ईसाच्या आकडेवारीच्या आधारे जागातिल वुहान,इटली,स्पेन आणि अमेरिकेतील पर्यावरण प्रदूषण कोविड—१९ टाळेबंदीमुळे ३० टक्याने घटले, तर लोकांची गतीशिलता ९० टक्के घटली. सर्व आर्थिक उपक्रम आणि व्यवहार ठप्प झाल्याने लोकांचे कारण आणि हालचाल बंद झाली आणी त्यातून हवेचे प्रदूषण कमी होण्यास मदत झाली.

**समारोप :—**

सद्यस्थितीत भारतात कोरोनाचा प्रभाव थोडाफार कमी झाल्यामुळे सरकारने उद्योग,सेवा व दळणवळण हे क्षेत्र सुरू केले व त्यामुळे देशाचा आर्थिक विकास दर सुधारत आहे. जनजीवन रूळावर येत आहे. कोवीड—१९ वर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरणाला सुरूवात झाली आहे. केद्र आणि राज्य सरकारांनी सामाजिक क्षेत्र, विशेषत आरोग्य, निवारा रोजगार, गरिबी बेकारी यांना आपल्या विकास धोरणात आणि राज्यवित्तीय धोरणानांही प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. आरोग्य, शिक्षण पायाभूत सेवा आणि सुविधा मोठया प्रमाणावर वाढविण्याबरोबरच खाजगी क्षेत्राचे नियमन करणे आवश्यक आहे.

संरचनात्मक सुधारणा आणि सहाय्यक समाज कल्याणकारी उपाययोजना दोन्ही गोष्टीबद्दल सरकारची कटीबद्धता या विकासाचा दर वाढविण्यात मदत करेल 'आत्मनिर्भर भारत' हा निर्धार सर्व हितकारकांच्या एकत्रित प्रयत्नाने दृढ केला जाईल आणि मजबुत सशक्त भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा उभारण्यास हातभार लागेल.

**संदर्भ :**

कराडे जगन :— जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन सदाशिव पेठ,पुणे—३०

जाधव अपेक्षा :— भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन, निराली प्रकाशन, शिवाजी नगर,पुणे

जिभकाटे शास्त्री :— स्थुल अर्थशास्त्राचे सिध्दांत—१ विश्व पब्लीशर्स् अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स,नागपूर

दैनिक लोकमत — १३ फरवरी २०१९

www.ibb.world

https://pib.gov.in

https://mu.ac.in